**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. २५/२०२३** **निशाणी क्र. ३४/लगत**

**<u>वि.प.साठी साक्षीदार क्र. १ चा उलटतपास शपथेवर सुरू</u>**

**<u>उलटतपास अर्जदारसाठी श्रीमती हणबर वकिल.</u>**

१. माझे आठवी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मला इंग्रजी लिहता वाचता येत नाही. माझे घरी माझे आईवडील, लहान भाऊ, आजी व माझी मुलगी असे आहोत. माझ्या मुलीचे नाव प्रतिक्षा असे आहे व ती माझेकडे आहे. माझे लहान भावाचे वय १८/१९ वर्ष असे आहे. माझा लहान भाऊ काही काम करीत नाही त्याचे शिक्षण चालू आहे. माझा लहान भाऊ इयत्ता ९ वी मध्ये शिकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी राहत असलेले घर हे माझे स्वताःचे आहे. माझे आईवडील हे काहीही कामधंदा करीत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचे वडील मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने अर्ज दाखल केल्यापासून ते मुलगा प्रदिप, मुलगी प्रतिक्षा व प्रिती यांना घेवून राहत होती. प्रतिक्षाचे वय सध्या ७ वर्षे आहे. प्रदिपचे वय ४ वर्ष आहे व प्रितीचे वय ६ वर्षे असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझी मुलगी प्रतिक्षा हीला एप्रिल २०२५ पासून ठेवून घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिक्षा माझे सोबत राहते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही नि.क्र. १७ वरील तडजोड पुरसीस प्रमाणे तीनही मुलांना घेवून माझेकडे नांदण्यास आली होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माझेकडे नांदायला आली असता मी तीला व्यवस्थीत नांदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/०४/२०२५ अर्जदाराने माझेविरूध्द शहापूर पोलीस ठाणेत फिर्याद दिली होती. साक्षीदार स्वताः सांगतो, ती एन.सी.आर.असून खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला दारू पिवून मारहाण केली, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली अशा आशयाची फिर्याद होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने माझ्यावर एन.सी.आर. दाखल केल्यानंतर ती तिच्या माहेरी पुन्हा आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माहेरी गेली त्यावेळी मी मुलगी प्रतिक्षाला जबरदस्तीने ठेवून घेतले व अर्जदाराला प्रतिक्षेला परत दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिक्षेला माझेकडे ठेवून घेतले आहे कारण मी अर्जदाराला धमकी देतो की, कोर्टकामकाज सुरू ठेवले तर मी प्रतिक्षेच्या जीवाला बरेवाईट करेन. हे म्हणणे खरे

नाही की, मी अर्जदाराला मुलगी प्रतिक्षा हिला भेटवण्यास मज्ञाव करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिक्षा हिला आईपासून दूर केले आहे व तीला धमकी देत आहे. मला माझे नावाचे आधारकार्ड आहे. प्रतिक्षा ही शिक्षण घेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही तीच्या मुलांच्या शिक्षणासाठी वेळोवेळी कागदपत्रे मागत आहे व ती कागदपत्रे दयायला मी टाळाटाळ करीत आहे. मी मुलगी प्रतिक्षा हीच्या शाळेसाठी शाळेने आधारकार्ड मागणी केल्यास देण्यास तयार आहे.

३. मी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत कामाला जातो. नि.क्र. १६ चा कागद काय आहे हे मला सांगता येणार नाही. अर्जदाराच्या दोन बहिणी विवाहीत आहेत. साक्षीदार स्वताः सांगतो त्या दोन्ही बहिणी माहेरीच राहतात. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार राहत असलेले ठिकाण हे झोपडपट्टीचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माझेसोबत ज्या वेळी राहिली ती माझ्या एकत्र कुटूंबात राहिली. लग्नानंतर मी व अर्जदार ७/८ महिने एकत्रात राहीलो. मी व अर्जदार वेगळे भुईनगर येथे राहिलो होतो. माझे बाकिचे कुटूंबही भुईनगर येथे शेजारी राहतात.

४. अर्जदार ही घरकाम करते. मी आजपर्यंत, मुलांना पोटगी खर्च दिलेला नाही व त्यांची भविष्याची सोयही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराची माझेसोबत नांदण्याची इच्छा होती व आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेवून, पैशाची मागणी करून अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व माझ्यामध्ये इतर लोकांनी समजोता घडविण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला पहिली व दुसरी मुलगी झाली या कारणावरून मी अर्जदाराचा छळ केला. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला तीसरे बाळ झालेनंतरही मी तीच्या चारित्र्यावर संशय घेवून तीचा छळ केला आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे कुटुंब बांधकामाचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी १० लोकांना कामगार म्हणून हाताशी घेवून बांधकाम व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, कृष्णा नगर इचलकरंजी येथे माझे स्वताःचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे दरमहा १ लाख रूपये उत्पन्न आहे. हे म्हणणे

खरे नाही की, मी व इतर वि.प.यांनी अर्जराच्या चारीत्र्यावर संशय घेवून अर्जदाराला घराबाहेर काढलेले आहे. मी पुढील तारखेला आधारकार्डाची सत्यप्रत दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी अर्जदाराला नांदावयाची कधीही इच्छा नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराची जबाबदारी ढकलण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावरती कोणाची जबाबदारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

साक्षीदारास त्याची न्यायालयासमक्ष नोंदविलेली साक्ष वाचून दाखविली व त्याने ती त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविल्याचे मान्य केले.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- १६/०३/२०२६.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.